**रे. दी. मु. नं. ४६ /२०१७**

**विजय जाधव वि. उत्तम जाधव**

## निशाणी ५३ खालील आदेश

प्रस्तुतच अर्ज प्रतिवादी १ व २ यांनी निशाणी ४४ येथील काढलेल्या मुद्यामध्ये सुधारित मुद्दा काढणेकरीता दाखल केला आहे.

२. प्रतिवादीच्या अर्जातील कथन असे की, वादीच्या दाव्यातील कथनाप्रमाणे प्रतिवादी क्र. १ व २ यांनी दिवाणी किरकोळ अर्ज नं. २२/२०१३ या अर्जात न्यायालयाची दिशाभूल करून सदरील आदेश प्राप्त केला आहे. सबब त्या अनुषंगाने मुद्दा काढणे आवश्यक आहे. तरी त्यामुळे वादिच्या कथनाच्या अनुषंगाने पुढील मुद्दा काढणे आवश्यक आहे. “Does plaintiff prove that, defendant no. 1 and 2 obtained order in civil application no. 22/2013 by misleading court?” असा सुधारीत मुद्दा काढावा अशी प्रतिवादीने विनंती आहे.

३. सदरच्या अर्जावर वादीने निशाणी ५४ येथे आपले म्हणणे दाखल करून सदरचा अर्ज हा निव्वळ दाव्याचे कामकाज पुढे ढकलण्यासाठी आहे , या कामी वादीने दिनांक ११.०१.२०१९ रोजी आपले सरतापासाचे प्रतिज्ञापत्र दाखल केले

आहे व त्यानंतर प्रतिवादीने वादीचा उलटतपास घेतलेला नाही. त्यामुळे सदरचा अर्ज विलंबाच्या कारणास्तव प्रथमदर्शनी फेटाळनेस पात्र आहे. तसेच सद्यस्थित मुद्दे ही बरोबर असून प्रतिवादीच्या अर्जातील कथना संदर्भात आहेत. सबब अर्ज खर्चासह फेटाळण्यात यावा ही विनंती केली आहे.

**४.** अर्ज तसेच म्हणणे याचे अवलोकन केले. वादी व प्रतिवादीच्या विधीज्ञांचा उक्तीवाद ऐकला. वादीच्या दाव्यातील कथनाचा विचार करता त्यामध्ये त्यांनी परिच्छेद ८ मध्ये प्रतिवादी क्र. १ व २ यांनी मे. कोर्टाकडून दि . की. अ नं. २२/२०१३ मध्ये खोडसाळ काथने करून लबाडी व फसवणूक करून आदेश मिळवला असे कथन केले. तसेच त्यांनी परिच्छेद १० मध्ये दि . की. अ नं. २२/२०१३ मधील आदेश हा Null and Void आहे अशी हककप्रस्थापणा करणेत यावी तसेच दावा मिळकत वादी कुटुंबाचे मालकी कब्जाभोग्याची आहे अशी हककप्रस्थापणा करणेत यावी अशी विनंती केली आहे.

**५.** दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०९ च्या आदेश १४ , नियम ५ प्रमाणे *"Order XIV Rule 5 of the CPC empowers the Court to amend issues or frame additional issues before passing a decree if such issues may be necessary for determining the matters in controversy between the parties."* सुधारित मुद्दा वादीच्या कथनाच्या अनुषंगाने असल्यामुळे अधिक सूस्पष्टता येणारी आहे तसेच उभय पक्षातील वाद अंतीमरीत्या न्यायनिर्णीत

करणेसाठी मदतच होणार आहे. त्यामुळे सुधारित मुद्दा काढणे मला न्यायोचित वाटते. प्रतिवादीने अर्जामध्ये सुचवलेला सुधारीत मुद्दा काढणे दावा न्यायनिर्णीत करणेसाठी महत्वाचा आहे. त्यामुळे पुढील प्रमाणे मुद्दा काढणेत येत आहे. “Does plaintiff prove that, defendant no. 1 and 2 fraudulently obtained order in civil application no. 22/2013 by misleading court hence, it is null and void?” तसेच सदर मुद्याच्या अनुषंगाने वादीस अधिक पुरावा द्यावयाचा झाल्यास त्यांना नेसर्गिक न्यायतत्वानुसार अधिक पुरावा देण्याची परवानगी देणे उचित वाटते . सबब, मी खालील आदेश पारित करीत आहे.

**आदेश**

१. अर्ज अंशत: मंजूर करणेत येत आहे.

२. वादिस सुधारित मुद्याच्या अनुषंगाने अधिक पुरावा द्यावयाचा झाल्यास त्यांना परवानगी देणेत येत आहे.

सही/-

दिनांक: ०२/ ०८/२०२३ (पी. आर. ढोरे )

कुडाळ सह दिवाणी न्यायाधीश,

कुडाळ